# संत साहित्य स्वरूप व परंपरा

प्रा.डॉ.शेटे देविदास मल्हारी,

मराठी विभाग प्रमुख

सावित्रीबाई कला महाविद्यालय,पिंपळगाव पिसा.

महाराष्ट्रामध्ये यादव कालखंडापासून अनेक पंथ उदयाला आले परंतु त्यांचे तत्वज्ञान व आचारधर्म कडक असल्यामुळे सर्व समाजापर्यंत ते पोहोचले नाहीत. तरीसुद्धा ते आजही काही प्रमाणात कार्य करताना दिसतात. या सांप्रदायाचा विचार केल्यास वारकरी संप्रदाय सर्वांनाच उजवा ठरावा असा पाहावयास मिळतो. याचे कारण यादव राजवटीमध्ये समाजाला कोणतीही दिशा राहिली नव्हती, जातीय व्यवस्था कठोर बनली होती. अशा अवस्थेमध्ये समाजाला दिशा देण्याचे काम संतांनी केले..

शके बाराशेमध्ये संत ज्ञानदेवांनी भागवत धर्माचा पाया घातला. त्याचा विस्तार नामदेवांनी केला. संत ज्ञानदेव व नामदेव यांनी भागवत धर्माचा झेंडा सर्वांच्या हातात देण्यात यश मिळवले. संत नामदेवांनी तर हा झेंडा पंजाबपर्यंत मिरवला. धर्मविषयक आचार, विचार समाजाला सांगण्याचे काम संत नामदेव, ज्ञानदेव यांच्या प्रभावळीतील संतांनी केले. संत नामदेव व ज्ञानदेव यांच्या कालखंडाच्या पूर्वी येथे महानुभाव पंथाने समाजप्रबोधन घडविण्याचे काम केले. त्याच समकालीन नाथ संप्रदाय येतो. त्यानेही समाजाला दिशा देण्याचे कार्य केले. परंतु त्यांचे आचार, विचार समाजाला पचनी पडणारे नव्हते म्हणून तो संप्रदाय मागे पडला. पण खऱ्या अर्थाने ज्ञानदेव व नामदेवांपासून प्रबोधनाला वेगळे वळण मिळाले; कारण नामदेवांनी व ज्ञानदेवांनी सर्व जातीधर्मातील संतांना संघटीत करून दांभिकता, धमभोळेपणा, अंधश्रद्धा, पाप, पुण्य, दैववाद अशा गोष्टींबद्दल समाजाला वस्तुनिष्ठ विचार सांगितले. भक्ती नामस्मरण हेच सुखाचे साधन आहे. यापेक्षावेगळा मार्ग स्वीकारण्याची गरज नाही. भक्ती करण्याचा अधिकार गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, शुद्र स्त्री-पुरुष या सर्वांना आहे. यामध्ये भेद नाही. व्यवस्थेने नाकारलेली भक्तीची दारे उघडली गेली. यामधून सर्व समाजामध्ये भागवत धर्माच्या माध्यमातून समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून हे प्रबोधन ज्ञानदेवांपासून तर थेट निळोबांपर्यंत चालू होते. निळोबा हे वारकरी संप्रदायातील शेवटचे संत झाले.

Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

**संत साहित्याचे स्वरूप :-**

संत साहित्याच्या स्वरूपाचा विचार करत असताना असे निदर्शनास येते की, संत साहित्याची निमिर्ती शके १२०० पासून पुढे झालेली दिसते. भागवत संप्रदायातील संत साहित्यातील पहिले साहित्यिक संत म्हणजे ज्ञानेश्वर होत. त्यानंतर नामदेव येतात. सर्वच संतांनी, आचार-विचार, नीतिमत्ता यांचा बारकाईने विचार केलेला दिसतो. स्वधर्मामध्ये असलेल्या अनिष्ट रुढी, परंपरा यावर संतांनी मीमांसा करून सत्याचा, निर्मळ भक्तिमार्ग दाखवला

दिशाहीन झालेल्या समाजाला संतांनी जो मार्ग सांगितला तो म्हणजे भक्तिमार्ग. संत साहित्य हे सर्व भक्तिसंप्रदायात निर्माण झालेले दिसते. संत साहित्याचे स्वरूप सांगत असताना प्रथम प्रश्न पडतो तो संत कोणाला म्हणावे ? याविषयी गजमल माळी म्हणतात, ''जो जगाचे आघात सहन करतो तोच खरा संत होय.'' समाजामध्ये मनुष्य कोणत्याही जातीचा असो संतत्वामुळे तो सर्वव्यापी होतो. या विचारातून आणि समाजात माजलेली अराजकता याला कुठेतरी आळा बसावा. या प्रयोजनातून संत साहित्याची निमिर्ती झाल्याचे दिसून येते. संत साहित्याची सुरुवात ज्ञानदेवांपासून सुरू झालेली दिसते. त्यांनी 'भावार्थ दिपीका' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामधून ज्ञानदेवांनी 'गीता' तत्वज्ञान जनसामान्यांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने भाष्य केले. याच भावार्थ दिपीकेला 'ज्ञानेश्वरी' म्हणतात. ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञान उद्‌बोधन करणारे आहे. त्यानंतर ज्ञानदेवांनी अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, अभंगवाणी, हरिपाठाचे अभंग इ. साहित्य निर्माण केलेज्ञानदेवांचे समकालीन संत म्हणजे संत नामदेव त्यांनी सर्व जातीधर्मातील लोकांना एकत्र करुने. सर्वांना भक्तीची दारे उघडी करून दिली. संत नामदेव आपल्या अभंगात म्हणतात-

''नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदिप लावू जगी ।।''

अशी ज्ञानदिप लावण्याची सुरुवात त्यांनी केल्याने कीर्तनाच्या रंगात नाचून ज्ञानाची ज्योत सामान्य माणसात तेवत ठेवली. त्याचबरोबर त्यांची साहित्यनिर्मिती केली. 'आत्मचरित्रस्वरूप' अभंग 'ज्ञानेश्वरचरित्र' आदि, तीर्थावळी, समाधी, बालक्रीडेचे अभंग इ.रचना निर्माण करून समाजाला ईश्वरी सत्य उलगडून दाखवले.

संत ज्ञानदेव आणि संत नामदेव यांच्या प्रभावळीतील संतांनिा वेगवेगळी ग्रंथनिर्मिती करून

Savitribai College of Arts * Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar * ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

संत साहित्याला वेगळे स्वरूप प्राप्त करून दिले. या प्रभावळीमध्ये चोखामेळा, सावता, नरहरी, सेना, परिसा भागवत, मुक्ताबाई, जनाबाई, विरोबा

खेचर इ. संत येतात. एकूण हे सर्व संत बहुजन समाजातील आहेत. या प्रत्येक संतांनी आपल्या अनुभवावरून कवित्व करून अभंग निर्माण केले. यामुळे संत साहित्याला वेगळे स्वरूप आल्याचे दिसून येते. संत नामदेवांनंतर बराच काळ या भक्तिसंप्रदायाचे प्रबोधन मदावलें होते. ते संत एकनाथांनी सुरू केल्याचे दिसून येते. त्यांनी चतुःश्लोकी भागवत, एकनाथी भागवत, रुक्मिणी स्वयंवर, भारुडे, भावार्थ रामायण, स्फुट प्रकरणे, शुकाष्टक, आनंदलहरी, गीतासार, चिरंजीवपद, गीतामहिमा, गौळणी, पदे इ. ग्रंथनिर्मिती करून समाजाचे प्रबोधन घडवण्याचे काम केले व भक्तिसंप्रदायाचे तत्त्वज्ञान समाजामध्ये रुजविण्याचे काम केले. शेवटी संत एकनाथांनंतर संत तुकाराम महाराजांनी स्वतःच्या अनुभवातून कवित्व केले आणि भक्तिसंप्रदायाचे महत्वपूर्ण तत्त्वज्ञान समाजापुढे मांडले. संत तुकाराम महाराजांनी स्वतःचे मन सत्यास बांधून घेतले आहे. बहुमत जरी दुसरीकडे असले तरी मी सत्य बोलेल त्या बहुमताला जुमानणार नाही, असे परखड मतही त्यांनी मांडले आहे. संत तुकाराम महाराजांची अभंगगाथा आजही समाजाला प्रेरणादायी ठरते.

**वारकरी संप्रदायाचे स्वरूप व तत्वज्ञान :-**

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रामध्ये उदयाला आला आणि अठरापगड जातीधर्मातील लोकांना एक लोकविद्यापीठ स्थापन झाल्याचा आनंद झाला. त्याच्या अगोदर महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे पंथ इथे प्रस्थान मांडून होते, परंतु या वारकरी संप्रदायात सर्व जाताधर्माच्या लोकांना आश्रय होता. गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, स्त्री-पुरुष, वर्ण, जात, लिंग, वंश यांनी कुठल्याही प्रकारचा मज्जाव नव्हता. याउलट महानुभव पंथासारखा पंथ जातीयतेला थारा देत नव्हता. तिथेही सर्वांना समान न्याय होता, परंतु त्यांचा आचारधर्म वेगळा होता. दारोदार भिक्षा मागून जीवन जगावे लागत होते. स्त्रियांना मज्जाव होता. परंतु वारकरी पंथात संप्रदायात 'यारे यारे लहानथोर याते भलते नारी नर'. लहानथोरांना, स्त्री-पुरुषांना हा पंथ

आपले समजून चालणारा पंथ होता. त्यामुळे सर्वसामान्यांना तो आवडला. या संप्रदायात फक्त रामकृष्ण हरीचा जप म्हणून खांद्यावर पताका हातात टाळ वीणा घेऊन विठ्ठलाचं भजन नामस्मरण करत राहणं याशिवाय दुसऱ्या प्रकारचे काम नाही. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान म्हणजे परमेश्वर

Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

चराचरात भरलेला आहे. या वारकरी संप्रदायाची पताका संत नामदेवांसारख्या संताने अगदी पंजाबपर्यंत ध्वजा फडकवली. सर्वात मोठा भागवत धर्माचा गणला गेलेला संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय, असे म्हटल्यास वावगे समजण्याचे कारण येत नाही. वारकरी संप्रदायात कीर्तन, भजन, प्रवचन या तीनही मार्गातून भक्तिमार्ग सांगितला जातो. 'भजन' हे असेच प्रबोधनाचे भक्तीचे साधन आहे. वारकरी संपदायात भजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वीणा, टाळ, मृदंगाच्या तालासुरावर ब्रह्मरस सेवन करणे म्हणजे भजन होय. भजनाचे स्वरूप सांगताना प्रथम 'रामकृष्ण हरी' या प्रकारचे भजन करून नंतर वेगवेगळ्या प्रकारचे अभंग घेऊन भगवंताचे नामस्मरण आणि त्यातूनच प्रबोधन घडविले जाते. भजन हे वारकरी संपदायात प्रबोधनाचे उत्तम माध्यम म्हणून वापरले जाते. त्याचबरोबर कीर्तन, वारकरी संप्रदायात कीर्तनास निरुपणही म्हणतात. कीर्तनाचे थोडक्यात स्वरूप सांगत असताना कीर्तनाला सुरुवात म्हणजे स्वतः मध्यभागी उभे राहता साथ देण्यासाठी मृदंगकार, टाळकरी, विणेकरी असतात. कीर्तनाचे दोन भाग पडतात. एक पूर्वभाग, एक उत्तरभाग. अभंगाचे एक एक चरण घेऊन त्याचे निरुपण केले जाते. त्यांचे निरुपण करत असताना अनेक संतांच्या अभंगांचे प्रमाण दिले जाते. भक्तिमार्गाचे, प्रबोधनाचे साधन व माध्यम आहे. प्रवचन देखील अशाच प्रकारे भक्तीचे माध्यम व साधन आहे. पण ते भजन व कीर्तनापेक्षा वेगळे आहे. यामध्ये प्रवचनकार हा खाली बसून प्रवचन सांगत असतो. वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान म्हणजे सर्व देवादिकांना समभावे पूजन करा. सर्व जातीधर्माच्या लोकांना देवाचे नामस्मरण करण्याचा अधिकार आहे. सर्वच परमेश्वराची लेकरे आहेत. मुखाने 'रामकृष्णहरी म्हणा' सर्व धर्म समभावाने राहावे. विठ्ठल हेच आद्यदैवत आहे आणि ती सर्वांना तारून नेणारी देवता आहे. इथे उच्चनीच कोणी नाही. सर्वजण समान आहेत त्यामुळे कोणासही लहानथोर समजू नये. तुळा पांगळा,

बहिरा पिसा, इथे कुणीही वेगळा नाही. सर्वांमध्ये विठ्ठल हे आराध्य दैवत आहे. सावळं परब्रह्म हेच सर्वांच्या मायेची सावली आहे. जात, पात, वर्ण, वंश, गरीब, श्रीमंत या बाबी वारकरी संप्रदाय मानत नाही. सर्वांना बंधुभावाने वागवतो असा हा संप्रदाय आहे.

**महाराष्ट्रातील संत परंपरा आणि कार्य :-**

मध्ययुगीन कालखंडाच्या अगोदर महाराष्ट्रात संत परंपरा उदयाला आल्याचे दिसते. शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरी लिहिल्यानंतर खऱ्या अर्थाने संत मंडळींच्या कार्याला सुरुवात होते. संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया घातला तर संत नामदेवांनी त्याचा विस्तार केला. संत तुकाराम

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

महाराज त्याचे कळस झाले हे विसरून चालणार नाही. या आशयाचा अभंग संत बहिणाबाईंनी आपल्या काव्यातून अवघ्या साहित्यक्षेत्राला लक्ष खेचून घेण्यास उपयोगी पडतो आणि संत तुकाराम महाराजांची महती जनलोकांपर्यंत पोहोचवतो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील भागवत धर्मीय संतांचे कार्य फार महत्त्वपूर्ण आहे. यामुळे संत मंडळींनी केलेल्या कार्याचा आढावा आणि त्यांची झालेली परंपरा याचा आढावा घेणे आवश्यक वाटते.

**संत ज्ञानदेव** :-संत ज्ञानदेवांचे अध्यात्म क्षेत्रात भरीव कार्य आहे. त्याचे उत्तमोत्तम उदाहरण म्हणजे ज्ञानदेवांच्या भरीव कामगिरीने त्यांच्या विचारांनी ते जनसामान्यांचे माऊली झाले आहेत. त्यांना वारकरी संप्रदायाने 'ज्ञानेश्वर माऊली' ही उपाधी बहाल केली ती यामुळेच की, त्यांचे कार्य हे अतुलनीय आहे.. त्यांनी जे सांस्कृतिक आणि साहित्यिक कार्य केले ते समाजाला प्रेरणा देणारे आहे.

ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा पाया रचला. त्यामुळे एक भक्कम असे साहित्यिक आणि सांस्कृतिक अधिष्ठान महाराष्ट्रातील समाजाला मिळाले. संत ज्ञानदेवांना तीन भावंडे होती. थोरले निवृत्तीनाथ, सोपान, मुक्ताबाई यांनीही काही ग्रंथरचना करून संत साहित्यात भर घातलेली दिसते.

**संत नामदेव** :वारकरी संप्रदायाच्या प्रभावळीमध्ये संत नामदेवांना महत्त्वाचे स्थान आहे संत नामदेवांनी समाजाला मानवतेची शिकवण दिली. त्यांनी भागवत धर्माचा प्रचार आणि प्रसार पंजाबपर्यंत केला. पंढरपुरापासून ते थेट पंजाबपर्यंत त्यांनी भागवत धर्माची पताका फडकवली. इ.स. १२७० ते १३५० हा संत नामदेवांच्या जीवनाचा कार्यकाल होय. संपूर्ण संत वाङ्मयात संत नामदेवांचे कार्य प्रभावी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांनी सर्व जातीधर्मातील लोकांना एकत्र करून भक्तिमार्ग सांगितला. संत नामदेव एका अभंगात म्हणतात,

''आम्हां सांपडलें वर्म । करू भागवत धर्म ।।१।। अवतार हा भेटला । बोलूं चालूं हा विसरला ।।२।। ''

उपरोक्त अभंगामधून संत नामदेव म्हणतात की, आम्हा आता या धर्माचे वर्म कळाले आहे. म्हणून आता भागवत धर्म करू. गाथेमध्ये संत नामदेवांचे सुमारे अडीच हजार अभंग आहेत. 'शतकोटी करीन तुझे अभंग' अशी संत नामदेवांची प्रतिज्ञा होती, असा उल्लेखही त्यांच्या गाथेत आढळतो. नामदेवांनी आत्मचरित्रपर असे ४११ अभंग लिहिले आहेत. मराठी साहित्यामध्ये पहिले पद्य चरित्रकार म्हणून नामदेवांचे नाव घेतले जाते. आदि, तीर्थावळी, समाधी. प्रकरणांमध्ये त्यांनी ज्ञानदेवांचे चरित्र लिहिले आहे. त्याचबरोबर स्वतःचेही आत्मचरित्र लिहिले. संत ज्ञानदेव आणि

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

नामदेव यांच्या समकालीन असलेल्या संतांचेही कार्य.मोलाचे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गोरा कुंभार, सेना न्हावी, सावतामाळी, जोगा परमानंद, नरहरी सोनार, विसोबा खेचर, चोखामेळा, बंका महार, संत जनाबाई अशा विविध जाती धर्माच्या संतांना एकत्र येण्यास भाग पाडले गेले. महाराष्ट्राच्या अध्यात्मिक क्षेत्रात प्रत्येक जात, धर्म, वर्ण, पंथ, वंश यांना महत्त्व न देता सर्व स्तरातील स्त्री-पुरुषांना समान वागणूक मिळाल्याने एक नवी अध्यात्मिक ठेवण तयार झाली आणि एक सांस्कृतिक ऐक्य टिकून राहिले

**संत गोरा कुंभार :-**संत ज्ञानदेव व नामदेव यांच्या प्रभावळीमध्ये संत गोरोबा यांचे स्थान मोलाचे होते. संत गोरोबा हे जातीने कुंभार होते. ते मडके घडवताना विठ्ठलाचे नामस्मरण करत असत. त्यांनी आपल्या अभंगामधून विठ्ठलभक्ती दर्शवली आहे.

''श्रवणें नयन जिव्हा शुद्ध करी । हरिनामे सोहं कारी सर्व काम ।।१।।

मग तुझा तुंचि दिवटा होसीगा सुभटा । मग जासील वैकुंठा हरिपाठे ।।२।। ''

आज संत गोरा कुंभार यांचे वीस-एकवीसच अभंग उपलब्ध आहेत. संत गोरोबांनी अगदी साध्या शब्दात अभंगरचना केली आहे. त्यामधून आपले ज्ञान व अनुभव मांडले आहेत.

**संत सावता माळी :-**संत सावता माळी हे जातीने माळी होते. ते काम करत असताना विठ्ठलाचे नाव घेत असत. त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवनच विठ्ठलमय करून टाकले होत. विठ्ठलाच्या नामस्मरणात ते स्वतःला हरवून बसले होते. त्यांनी समाजास एक नवा आदर्श घडवून दिला. तो म्हणजे कामातच राम आहे. ते माळी जातीचे असल्यामुळे शेत बागाईत करू, आमच्या हाती मोट नाडा आहे, आम्ही फुलझाडांना पाणी देतो असेही त्यांनी नमूद केले आहे. याबरोबरच ते आमची जात माळ्याची आहे असेही नमूद करतात. संकल संत गाथेमध्ये त्यांचे फक्त बारा अभंग सापडतात. संत नामदेव त्यांच्याविषयी म्हणतात- 'सावता सागर प्रेमाचा आगर' त्यांच्यातील भक्तीरूपी प्रेमाचा सागर नामदेवांनी सांगितला. संत सावतामाळी सामाजिक व धार्किक विषमतेचे बोलके उदाहरण देताना म्हणतात-

''भली केली हीन याती । नाही वाढली महंती ।।१।।

जरी असतां ब्राह्मण जन्म । तरी हें अंगीं लागतें कर्म ।।२''

वरील अभंगावरून असे निदर्शनास येते की, संत सावता यांनी आपले अनुभव साध्या आणि सोप्या भाषेत मांडले आहेत.

Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

**संत नरहरी सोनार :-**संत नरहरी हे सुरुवातीला कट्टर शैवपंथी होते. नंतर ज्ञानदेव, नामदेवांच्या सहवासात आल्यानंतर ते वैष्णव झाले. त्यांचे फक्त आठ ते दहा अभंग उपलब्ध आहेत. त्यांचा व्यवसाय सुवर्णकाराचा होता. त्यांनी कामातच विठ्ठल पाहिला होता. त्यांचे पांडुरंगविषयक प्रेम त्यांच्या अभंगाद्वारे पाहावयास मिळते. ते म्हणतात-

''नाम फुकाचें फुकाचें । देवा पंढरीरायाचें ।।१।। नाम अमृत हें सार । हृदयीं
जपा निरंतर ।।२।। ''

नामस्मरणाचे महत्त्व सांगणारे संत नरहरी यांचे अभंग आजही लोकप्रिय आहेत.

**संत चोखामेळा :-**संत चोखामेळा हे मूळचे मंगळवेढ्याचे राहणारे होते. त्यांनी अनेक तीर्थयात्रा केल्यानंतर ते पंढरपूर येथे आले व नामदेवांच्या कीर्तनाने हरिनामाशी एकजीव झाले. त्यांनी आपल्या अभंगातही समतेचा संदेश सांगितला आहे.

''टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट ही चालावी
पंढरीची ।।१।। पंढरीची हाट कऊलांची पेठ ।
मिळाले चतुष्ट वारकरी ।।२

सेना न्हावी :-संत सेना न्हावी यांचे मूळ गाव हे जबलपूरजवळील बांदूगड हे होते. परंतु तीर्थयात्रा करीत महाराष्ट्रात आले. पंढरीत ते वैष्णवमय झाले. ते आपल्या अभंगामधून विठ्ठलाचे नाम घेताच पापाचे पर्वत जळतात असे ते म्हणतात. संत सेना यांनी गौळणीदेखील लिहिल्या आहेत. त्यातीलच एक गौळण पुढीलप्रमाणे-

''मोक्ष आणि मुक्ति । हे तो तुम्हांसी आवडती ।।१।। एका नामांवाचून कांहिं । नसे
आवडी आम्हां पाही ।।२।। ''

वरील अभंगामधून संत सेना यांनी नामाचा महिमा वर्णन केल्याचे पहावयास मिळते.

**विसोबा खेचर :-**विसोबा खेचर यांचे सकल संत गाथेमध्ये एकूण दोनच अभंग उपलब्ध आहेत. ते संत नामदेवांचे गुरु होते व संत ज्ञानदेवांचे शिष्य होते. 'खेचर म्हणे मज ज्ञानराज गुरु' अशी ग्वाही ते देतात. समाजाला उपदेश करण्यात ते धन्यता मानतात.

**संत मुक्ताबाई :-**निवृती, ज्ञानदेव, सोपानदेव या भावंडांमधील लहान असणारी मुक्ताई ही त्यांची बहीण

Savitribai College of Arts Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

आहे. वसंत मंडळीतील सर्वात मोठी कवयित्री आहेत. त्यांचा 'मुंगी उडाली आकाशी' हा अभंग खूप नावाजला व प्रसिद्ध पावला. त्यामध्ये त्या म्हणतात-

> "मुंगी उडाली आकाशीं। तिणें गिळिलें सूर्याशी ।।१।। थोर नवलाव जाहला।
> वांझे पुत्र प्रसवला ।।२।।"

वरील अभंगाची रचना ही कुटकाव्याची रचना आहे असे दिसते. यामधून त्यांनी अतिशयोक्तिपनाचाही नमुना दर्शवल्याचे दिसून येते. या अभंगाबरोबरच त्यांचे ताटीचे अभंगही प्रसिद्ध आहेत.

**संत जनाबाई :**संत कवयित्रीमधील संत जनाबाई एक महत्त्वाच्या कवयित्री आहेत. त्यांनी नामयाची जनी म्हणविण्यात आपल्या जीवनाचे सार्थक मानले. जनाबाईंच्या स्त्री मनाला हळूहळू भक्तीची उत्कंठा लागल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे अभंग हे भावगीतासारखे दिसून येतात. त्यांनी पांडुरंगाचे नाम हाच भक्तीचा सोपा मार्ग सांगितला आहे. संत जनाबाई आपल्या अभंगांमधून देव आणि भक्त यांचा संगम दाखवतात. संत जनाबाईंच्या नावावर ३५० अभंग ही एक उत्कृष्ट भावगीतातील मालिका आहे. जनाबाई कृष्ण जीवनातील विशेषतः जलक्रीडेचे वर्णन यामधून जनाबाईची आकर्षक वर्णनशैली आणि स्त्री मनातील स्वाभाविक असा भक्तिभाव दिसून येतो.

**संत भानुदास** :-संत भानुदास हे संत एकनाथांचे पणजे होते. यादव काळामध्ये कृष्ण देवरायाने पांडुरंगाची मूर्ती विजयनगर येथे नेली होती. ती मूर्ती पुन्हा पंढरीस आणण्याचे मोलाचे काम संत भानुदासांनी केले आहे. संत भानुदासांपूर्वीही त्यांच्या घराण्यात पंढरीची वारी चालू होती. ते आपल्या अभंगांमधून म्हणतात-"तुमचे नामगोड नाम गोड। पुरवी कोड जीवांचे ।।१।। वाचे सुलभ नामावळी। महादोषा होय होळी ।।२।।"

**संत एकनाथ :-**संत एकनाथ यांचा जन्म पैठण येथे झाला. वारकरी संप्रदायाची परंपरा संत एकनाथांच्या घरात होती. त्यामुळे संत एकनाथ हे तात्काळ वैष्णवमय झाले. वयाच्या बाराव्या वर्षापासून गुरुसेवा, अठराव्या वर्षी सुलभ पर्वतावर सगुण साक्षात्कार, गुरुसोबत तीर्थयात्रा, पंचविसाव्या वर्षापासून पैठणास ग्रहस्थाश्रम व वयाच्या साहसष्टाव्या वर्षी शके १५५१ (इ.स. १५९९) ला देहावसान झाले. संत एकनाथांनी आपले समग्र जीवन हे पांडुरंगाच्या भक्तीत घालवले. नाथांनी काही ग्रंथनिर्मिती केली ती अशा प्रकारे- चतुःश्लोकी भागवत, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण रुक्मिणी स्वयंवर, स्फूटप्रकरणे, पदे, [illegible]णी, भारूडे इ. साहित्य त्यांनी

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

निर्माण केले. संत एकनाथांची भारूडे आजही तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचलेली आहेत. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजाला एक वेगळा भक्तिमार्ग सांगितला.

''केला संतीं उपकार । दिधलें घर गावुनी ।।१।। नये ध्यानीं मनीं लक्षीं ।
तो प्रत्यक्षीं दाविला ।।२।। ''

वरील अभंगांमध्ये भक्तीविषयी संत एकनाथांनी कवित्व केले आहे.

**संत शेख महंमद :-**संत शेख महंमद यांना हिंदु-मुस्लिम यांच्यातील सलोखा साधणारे संत म्हणून ओळखले जाते. 'योगसंग्राम' हा त्यांचा प्रमुख ग्रंथ आहे. त्यानंतर 'पवन विजय' हा ग्रंथ आहे. निष्कलंक प्रबोधन आणि ज्ञानसागर इ. ग्रंथ व काही पदे त्यांनी लिहिली आहेत. त्यांचे महत्वाचे काम म्हणजे हिंदु-मुस्लिम या दोन धर्मांमध्ये 'एकता' निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. त्यांचा काही कार्यकाळ संत एकनाथांबरोबर तर काही संत तुकाराम महाराजांबरोबर गेला.

**संत तुकाराम महाराज**:-महाराष्ट्रात प्रत्येक व्यक्तीला संत तुकाराम महाराजांचे नाव सर्वज्ञात आहे. अशिक्षित-सुशिक्षित, गरीब-श्रीमंत अशा सर्व प्रकारच्या लोकांना संत तुकाराम महाराजांचे नाव माहित आहे. तसेच त्यांच्या अभंगवाणीने मराठी मनाला मोहित केले आहे. संत तुकाराम महाराजांविषयी कितीही वाचले तरीही मनाचे समाधान होत नाही. सतत मनाला भिडणारा, अस्वस्थ करणारा आणि प्रत्येक अभंगात अर्थाचे नवनवे पदर गुंफणारा, त्याचे विविध पैलू जाणवून देणारा कवी म्हणजे संत तुकाराम महाराज होत. मराठी कवितेत तुकाराम महाराजांच्या कवितेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांची कविता आजच्या कवितेच्या संदर्भात अनेक नवे प्रश्न उपस्थित करते. संत तुकाराम महाराजांची कविता पृष्ठभागाचे मनोहारी आणि परखड दर्शन देत अंतरंग मात्र आतल्या आत दडवणाऱ्या हिमनगासारखी आहे. ती अंतरंगात उतरली की, तिच्यातल्या व्यापक अनुभूतीचे दर्शन घडायला लागते. साहित्यविषयक विचाराला गती देण्याचे सामर्थ्य या कवितेत आहे. तुकाराम महाराजांच्या कवितेतील अनुभवाची समृद्धी, ताजेपणा अजोड आहे.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगावरून त्यांना ओळखले जाते. त्यांनी समाजातील सर्व विषयावर अभंग केल्याने ते सर्वांना जवळचे वाटतात. संत साहित्यात व वारकरी संप्रदायात महत्वाचे स्थान प्राप्त करतात. त्या सर्वच बाबींचा उल्लेख करणे क्रमप्राप्त वाटते.

संत तुकाराम महाराजांच्या प्रभावळीमध्ये **संत बहिणाबाईंनी** आपल्या 'संतकृपा झाली । इमारत फळा

Savitribai College of Arts ★ Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar ★ ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

आली' या अभंगाशिवाय वारकरी संप्रदायाची पूर्तता होत नाही. संतांच्या कार्यांचा गोषवारा एकच अभंग त्यांची महती सांगून जातो आणि तुकाराम महाराज प्रभावळीतील संत बहिणाबाई वारकरी संप्रदायात आपले स्थान पक्के करून जातात. **संत तुकाराम महाराजांचे बंधू कान्होबा** विठ्ठलाशी भांडून आपला अधिकार त्याच्यावर गाजवतात तर भागूबाईही आपले वारकरी संप्रदायातील महत्त्व सिद्ध करते. रामेश्वर भट तर संत तुकाराम महाराजांच्या कार्याचा आणि काव्याचा परामर्श घेताना त्यांच्या व्यक्तित्वावरुन नजर फिरवताना त्यांच्या जीवनात रामेश्वर भटांचे महत्वाचे स्थान आहे. त्यांना रामेश्वर भटांनी खूप त्रास दिला. अनेक अग्निदिव्यातून त्यांना जावे लागले व ते स्वत: वारंवार सिद्ध करत गेले आणि संत तुकाराम महाराज ही मोठी दिव्य तेजी व्यक्ती आहे हे सिद्ध झाल्यावर स्वत: रामेश्वर भटांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले आणि ब्राह्मण असूनही वारकरी संप्रदायात स्वत:ला झोकून देऊन आपली वारकरी संप्रदायात एक वेगळी ओळख तयार करून ठेवली. **संताजी तेली जगनाडेंनी** आपला तेल्याचा व्यवसाय करता करता विठ्ठलाचे नामस्मरण केले. संत तुकाराम महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले आणि संत तुकाराम महाराजांच्या प्रभावळीत येऊन पोहोचले व वारकरी संप्रदायात आपले स्थान तयार केले. **कचेश्वर ब्रह्मे** यांनी आपल्या वैदिक आणि ब्राह्मणवादी वैचारिकतेला सोडून वारकरी संप्रदायाची कास त्यांनी धरल्यामुळे ते ओळखले जातात. त्यांनी संत तुकाराम महाराजांचे शिष्यत्व स्वीकारल्याने त्यांना स्व-समाजाचा छळ सहन करावा लागला आणि त्या छळामुळेच त्यांना वारकरी संप्रदायाचे महत्त्व पटू लागले व त्यांनी ते सोडलेदेखील नाही. या त्यांच्या स्वभावामुळेच ते ओळखून येतात.

**संत निळोबाराय पिंपळनेरकर :–**संत निळोबाराय हे संत तुकारामांचे शिष्य होते. त्यांचा जन्म 'अहमदनगर' जिल्ह्यातील 'पिंपळनेर' येथे झाला. त्यांनी तुकारामांचा व्यासंग पाहून त्यांना आपले गुरु मानले. संप्रदायाची धुरा आपल्या खांद्यावर घेऊन चालू लागले. त्यांना संत तुकाराम महाराजांनी स्वप्नात अनुग्रह दिला आणि मग त्यांनी वारकरी संप्रदायाचे कार्य आणि भजनी संप्रदाय वाढवला. संत निळोबारायांचे १३०० अभंग उपलब्ध आहेत. ज्ञानेश्वरी, नाथ भागवत या काव्याचा त्यांच्यावर प्रभाव पडला, तर तुकोबांच्या अभंगवाणीचा खोल ठसा उमटलेला दिसतो. निळोबारायांनी संत तुकाराम महाराजांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले आहे.

''येवोनियां कृपावंतें । तुक्यास्वामी सद्‌गुरूनाथें ॥१॥
हात ठेविला मस्तकीं । देऊनि प्रसाद केलें सुखी ॥२॥''

Savitribai College of Arts ★ Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar ★ ID. No. PU/AN/A 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

तदनंतर त्यांनी चांगदेव-ज्ञानेश्वर चरित्र लिहिले व संत तुकोबांच्या स्तुतीपर ३३३ श्लोक लिहिले आहेत. याशिवाय संत भागूबाई, कान्होपात्रा, सोयराबाई या कवयित्रींनीही वारकरी संप्रदायाला मोलाचे योगदान दिले आहे.

नये बोलों परि पाळिलें वचन । केलियाचा प्रश्न

तुम्ही संती ।। संवसारें जालों अति दुःखें दुःखी ।

मायबाप सेखीं क्रमिलिया ।। ''

अशा प्रकारे तुकोबांच्या आयुष्यास कलाटणी मिळाली. त्यांनी कथाकीर्तनकारांच्या मागे उभे राहून कीर्तनाचा अभ्यास केला. संतांच्या पायांचे तीर्थ सेवन केले. दुसऱ्यांवर उपकार करण्याचे व्रत चालू ठेवले. प्रपंचात गोविणाऱ्या नातेवाईकांचे व बहुमताचे न ऐकता स्वतःच सत्य व असत्याचा निवाडा करावा असे त्यांनी मनाशी ठरविले. तुकारामबुवांचे मन उन्नत होत गेले. त्यांनी श्रीबाबाजी चैतन्य या सत्पुरुषांचा उपदेश झाला. नामदेवांकडून कवित्वाची प्रेरणा मिळाली व तुकाराम महाराजांची अभंगवाणी तेजस्वी स्वरूपात स्त्रवू लागली. स्वतःस आलेले पारमार्थिक अनुभव त्यांनी अभंगांतून वर्णन केले.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगावरून त्यांना ओळखले जाते. त्यांनी समाजातील सर्व विषयावर अभंग केल्याने ते सर्वांना जवळचे वाटतात व वारकरी संप्रदायात महत्त्वाचे स्थान प्राप्त करतात. त्या सर्वच बाबींचा उल्लेख करणे क्रमप्राप्त वाटते.

समारोप :-

'संत साहित्याचे स्वरूप व वाटचाल'मध्ये संत साहित्याचे स्वरूप स्पष्ट करतानाच महाराष्ट्रातील संत परंपरा संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत नरहरी सोनार, संत चोखामेळा, संत सेना न्हावी, विसोबा खेचर, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत भानुदास, संत एकनाथ, संत शेख महंमद, संत निळोबा या सर्व संतांचा परामर्श घेऊन त्यांच्या कार्याचाही परिचय करवून दिला आहे.

संत साहित्याचे स्वरूप व वाटचाल यांच्या संत साहित्यातील वाटचालीचे हे खरे मर्म आहे, महाराष्ट्रामध्ये यादव कालापासून अनेक पंथ उदयाला आले. उदयाला आलेल्या अनेक संप्रदाय / पंथाचा विचार केल्यास वारकरी संप्रदाय सर्वांनाच उजवा ठरणारा आहे.शके बाराशेमध्ये संत ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माचा म्हणजे वारकरी संप्रदायाचा पाया घातला. संत नामदेवांनी या वारकरी

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

संप्रदायाचा झेंडा पंजाबपर्यंत मिरविला तरोच संत तुकाराम महाराज या संप्रदायाचे कळस झाले. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रामध्ये उदयाला आल्यामुळे अठरापगड जातीतील लोकांना एक लोकविद्यापीठच मिळाले.या संप्रदायामध्ये सर्व समाजातील लोकांना स्थान होते.जीवनाचे उत्कट भावदर्शन असल्यामळे अभंगवाणीच मराठीतील लोककाव्याचा महान आदर्श ठरला. भक्तीक्षेत्रात ज्ञानदर्शनापेक्षा भावदर्शन प्रभावी ठरले.

## संदर्भ ग्रंथ


१) माळी गजमल, पिंगे श्री. म., 'संत तुकारामांचे निवडक अभंग-चरित्र', व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती १९७८,

२) साखरे नानामहाराज (संग्राहक), 'श्री नामदेव गाथा', वरदा बुक्स, पुणे पुनर्मुद्रण १९९६,

३) श्री सकलसंतवाणी (मराठी) खंड-१, गोरा कुंभार, गीता प्रेस, गोरखपूर,

४) श्री सकलसंतवाणी (मराठी) खंड-२, गोरा कुंभार, गीता प्रेस, गोरखपूर,

५) साखरे नानामहाराज (संग्राहक), 'श्री निळोबा गाथा', वरदा बुक्स, पुणे १९९६, .

६) जोशी प्र.न.'तुकारामांचे निवडक अभग,स्नेहवर्धन पब्लिकेशिग पुणे


Savitribai College of Arts ★ ID. No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimp... Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar